ज्वलंत हिंदुत्वाचा पुरस्कार करणारे एकमेव मराठी दैनिक

सामना

पुणे

वर्ष : ९ अंक : २४०, सोमवार, दि. २० सप्टेंबर २००४ ■ पान १०

संपादक : बाळ ठाकरे





# इंजेक्शने, सलाईन नसलेले हॉस्पिटल

होमिओपॅथिक डॉक्टर सर्व रुग्णांना सारख्याच 'साबुदाण्याप्रमाणे दिसणाऱ्या' गोड गोळ्या देतात. अशाप्रकारचे अनेक समज-गैरसमज या औषधोपचार पद्धतीसंदर्भात आपल्यात आहेत. मात्र, होमिओपॅथीची औषधे फक्त रोगच बरा करते असे नाहीतर आजाऱ्यालाही बरे करते. म्हणजेच आजार समूळ नष्ट करते. होमिओपॅथीचे हे महत्त्व पटवून देण्यासाठी पिंपरीतील डॉ. अमरसिंह निकम आणि त्यांचे कुटुंब सातत्याने प्रयत्न करत आहेत. यासाठी निकम यांनी १० वर्षांपूर्वी पिंपरीत तपोवन रोडवर 'आदित्य होमिओपॅथी हॉस्पिटल ॲण्ड हिलींग सेंटर'ची स्थापना केली. संपूर्ण हिंदुस्थानातील हे बहुदा एकमेव होमिओपॅथी रुग्णालय आहे.

होमिओपॅथी रुग्णालय सुरू करण्याचे कारण सांगताना डॉ. निकम म्हणाले, महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना होमिओपॅथीचे दवाखाने आहेत. मात्र, रुग्णालय नाही, ही खंत सतत मनात टोचत होती. मग आपणच होमिओपॅथीचे रुग्णालय सुरू करायचे, हे ध्येय मनात पक्के केले. पुण्यातील मोठमोठ्या रुग्णालयात जाऊन रुग्णांवर होमिओपॅथीक उपचार करत होतो. त्यामध्ये यश मिळत गेले. त्यामुळे रुग्णाच्या इतर अनावश्यक खर्चातदेखील मोठी बचत होत गेली. मात्र, येथे रुग्ण पूर्णवेळ माझ्या निरीक्षणाखाली राहत नव्हता. रुग्णांचा अभ्यास, रोगनिदान, आजार आणि होमिओपॅथिक औषधे यांचा सखोल अभ्यास करून १४ वर्षांनंतर रुग्णालय उभारले.



या होमिओपॅथी रुग्णालयात तुम्हाला कोठेच इंजेक्शन, सलाईन किंवा ऑक्सिजन नजरेस पडणार नाही. त्यामुळे रुग्णाला आपण रुग्णालयात आहोत, असे वाटत नाही. या औषधोपचार पद्धतीत रुग्णाची प्रकृती, आवडी-निवडी, स्वभाव, शरीर आणि मन या सर्वांचा सखोल अभ्यास करून औषध दिले जाते. रुग्णाला शर्करायुक्त औषधांच्या गोळ्या दिल्या जातात. या गोळ्या तोंडात विरघळण्याची प्रक्रिया सुरू असतानाच औषधी शक्ती अतिशय जलदरीत्या शरीरात कार्यरत होते. त्यामुळे ही औषधे अतिशय यशस्वी आणि परिणामकारक होतात.

डॉक्टरांकडे औषधोपचार घेण्यासाठी संपूर्ण हिंदुस्थानामधून तसेच परदेशामधूनदेखील विविध रुग्ण येत असतात. हृदयविकार, किडनीचे विविध आजार, यकृताचे आजार, मधुमेह, मणक्याचे आजार, मानसिक व्याधी, अल्सर, मुतखडा, ॲपेंडीस यासारख्या अनेक आजारांनी ग्रासलेल्या रुग्णांना त्यांनी केवळ औषधोपचाराने ठणठणीत केले आहे, असा त्यांचा दावा आहे. रुग्णाचाही शस्त्रक्रिया करून पुढील अनेक कटकटी आणि पैसा यामुळे वाचला आहे. मात्र, रुग्णाला पूर्णत: बरे व्हायचे असेल तर त्याला नेमकं काय होतंय, स्वत:ची मानसिक अवस्था याची संपूर्ण खरी माहिती कोणताही आडपडदा न ठेवता डॉक्टरांना सांगणे आवश्यक आहे, असे ते म्हणतात.

आधिक माहितीसाठी डॉ. निकम यांच्याशी फोन क्र. २७४१२५४९ वर संपर्क साधावा. ■